FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.I

पहिली खबर

0167743

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District बृहन्मुंबई, पोलीस ठाणे Police Station ॲ.सी.बी. पहिली खबर क्र. FIR No. ९६, वर्ष Year २०२० दिनांक Date ०८/१०/२०

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.आधि.१९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act -, कलमे Sections -
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ......, तारीख पासून Date from दि. २५/२/२०१६ वेळ Time ......, तारीख पर्यत Date to ......, वेळ Time ......
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date -, वेळ Time
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ३०/२०२० तारीख Date ०८/१०/२० वेळ Time १५.०० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : ......, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. दि चिल्ड्रन एड सोसायटी संचालित निरीक्षणगृह/बालगृह उमरखाडी, डोंगरी, मुंबई बीट / चौकी Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ......, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री सचिन पाटील (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री लक्ष्मण पाटील
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४० वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८२८६७६८०८१
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......, दिल्याचा दिनांक Date of Issue ......, दिल्याचे ठिकाण Place of Issue ......, (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ......, जनजात Sub-Caste ......
   (h) पत्ता Address : ......, गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. ......, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place सर पोचखानवाला रोड, गाव Village ......, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka वरळी, जिल्हा Dist. बृहन्मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address -

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

दिपक काशिनाथ सांगळे, वय ३२ वर्षे, तत्कालीन रक्षक (भांडार लिपीक पदाचा अतिरिक्त कार्यभार, बालसुधारगृह, डोंगरी, मुंबई रा. वनश्री गजानन अपार्टमेंट, ए ल विंग, फ्लॅट नं. ३०७, खडकपाडा कल्याण (पश्चिम), जि. ठाणे.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K)/829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी नामे श्री सचिन लक्ष्मण पाटील, वय-५० वर्षे (पो. निरी. लाप्रवि, मुंबई) यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखीत केलेला जबाब हाच प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Pawle

(प्रविण पावले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Patil

Scanned with CamScanner

<u>फिर्याद</u> दि. ०८/१०/२०२०

सचिन लक्ष्मण पाटील, वय–४० वर्षे, धंदा–नोकरी (पोलीस निरीक्षक, एक टप्पा पदोन्नतीने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०

---

मी सचिन लक्ष्मण पाटील, माहे ऑगस्ट २०१९ पासुन एक टप्पा पदोन्नतीने पोलीस निरीक्षक या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे नेमणुकीस आहे.

दि. २७/०४/२०१६ रोजी 'झी न्युज' या दुरचित्र वाहीनीवर 'दि. चिल्ड्रेन एड सोसायटी' संचालित निरीक्षण गृह/बालगृह, उमरखाडी, डोंगरी, मुंबई या संस्थेमधील भ्रष्टाचाराबाबत एक स्टींग ऑपरेशनची बातमी प्रसारीत करण्यात आली होती. यामध्ये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम–२००० अंतर्गत काळजी व संरक्षणासाठी निरीक्षण गृह/बालगृह, उमरखाडी, डोंगरी, मुंबई येथे दाखल झालेल्या बालकांना परत त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याकरीता नमुद संस्थेमधील कर्मचारी व अधिकारी हे पालकांकडुन पैशांची मागणी करतात व पैसे दिल्यानंतरच बालकांना पालकांच्या ताब्यात दिले जात असल्याचे वृत्त प्रसारीत करण्यात आले होते. त्याअनुषंगाने कलकत्ता उच्च न्यायालयाचे निवृत्त सर न्यायाधीश श्री. जे.एन.पटेल यांनी दिलेल्या पत्रावरून मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी क्रिमीनल सुओ मोटो पिटीशन क्र. ०१/२०१६ अन्वये पिटीशन दाखल केले आहे. यामध्ये महाराष्ट राज्य शासन यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

निरीक्षण गृह/बालगृह, उमरखाडी, डोंगरी, मुंबई हे 'दि. चिल्ड्रेन्स एड सोसायटी' याच्या अख्यत्यारीत येत असल्याने मुख्य अधिकारी, 'दि. चिल्ड्रेन्स एड सोसायटी' यांनी या संदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सुनावणी दरम्यान मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी बाल सुधारगृहाच्या संबंधीत कर्मचाऱ्याविरूद्ध Prevention of Corruption Act नुसार कारवाई करण्याबाबत आदेशीत केल्याने मुख्य अधिकारी, 'दि. चिल्ड्रेन्स एड सोसायटी' यांनी मा. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पत्राद्वारे संबंधीत कर्मचाऱ्याविरूद्ध Prevention of Corruption Act नुसार कारवाई करण्याबाबत पत्राव्दारे कळवून सोबत झी मिडीयाने केलेल्या स्टींग ऑपरेशनची सी.डी. सादर केली आहे.

मा. महासंचालक, ला.प्र.वि यांनी दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणी उघड चौकशी क्रमांक ११/२०१७ अन्वये चौकशी सुरू करण्यात आली. नमुद चौकशीच्या अनुषंगाने प्राप्त सी.डी. मधील संभाषणाचे ट्रान्सस्क्रीप्ट तयार करुन घेण्यात आले. सदर ट्रान्सस्क्रीप्टचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमुद स्टिंग ऑपरेशन करणारे झी न्युजचे रिपोर्टर श्री. राजीव रंजन सिंह, प्रवेशीत बालके काम करीत असलेल्या आस्थापनेचे मालक श्री. अली मोहम्मद हिरा शेख यांच्यासोबत लोकसेवक दिपक काशिनाथ सांगळे हे मुलांना बालसुधार गृहातुन सोडविण्यासाठी मोबदला म्हणुन रोख रक्कमेची मागणी करून त्यामध्ये तडजोड करीत **" मेरा कम देदो चाहिऐ तो ..." " जिधर आप मुझे बीस हजार दे रहे हे जिधर बीस देना है उधर अठरा हजार देना है ओके"** अशी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न होत आहे.

नमुद प्रकरणी स्टिंग ऑपरेशन करणारे झी न्युज चॅनलचे रिपोर्टर श्री. राजीव रंजन सिंह यांच्याकडे केलेल्या चौकशी दरम्यान त्यांनी आपल्या जबाबात सांगीतले की, झी न्युज चॅनलच्या लोअर परेल, मुंबई कार्यालयात, 'दि चिल्ड्रेन्स एड् सोसायटी बालगृह', उमरखाडी डोंगरी, मुंबई येथे

Scanned with CamScanner

ठेवण्यात आलेल्या बालकांना त्यांचे पालकांना ताब्यात देण्यासाठी पैशांची मागणी करीत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्याप्रमाणे श्री. सिंग हे छुप्या कॅमेऱ्यासह श्री. अली तसेच प्रवेशित मुलांचे पालक श्री. हमीद मंडल व सिराज खान यांच्यासह सुधार गृहामध्ये जावुन दिपक सांगळे यांना भेटले. दिपक सांगळे यांनी मुलांना सोडण्यासाठी कोर्टात प्रत्येकी रु. ५,०००/– भरावे लागतील असे सांगुन ते स्वतंत्र पाकीटात भरुन त्यावर प्रवेशित मुलांची नावे लिहीण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री. अली यांनी दोन पाकिटांमध्ये पाच पाच हजार रूपये भरले व त्यावर प्रवेशित बालकांची नावे लिहिली. त्यानंतर तिसऱ्या पाकीटात ठरल्याप्रमाणे उरलेले पैसे भरण्यास सांगितले त्यावेळी श्री. अली यांनी तिसऱ्या पाकीटात रु. ७,०००/– भरले. नमुद तिनही पाकिटे श्री. दिपक सांगळे यांना देत असताना तिसऱ्या पाकीटात ठरल्यापेक्षा कमी पैसे असुन रु. ७,०००/– असल्याचे त्यांनी सांगितले असता श्री. दिपक सांगळे यांनी त्यांच्या वरिष्ठांना रु. २०,०००/– बाबत आश्वासन दिले असल्याचे सांगुन ते स्वत: कमी पैसे स्विकारणार नाही असे बोलु लागले. त्यावर श्री अली यांनी आणखी काही रुपये तिसऱ्या पाकीटात टाकुन उर्वरित रक्कम नंतर देतो असे सांगुन तीनही पाकीटे श्री. दिपक सांगळे यांना दिली असता श्री. दिपक सांगळे यांनी ती तीनही पाकीटे स्विकारली आणि त्यानंतर कार्यालयीन कामकाजाची पुर्तता करुन प्रवेशित मुलांना त्यांचे ताब्यात देण्यात आले.

नमुद प्रकरणी प्रवेशीत मुले बालकामगार म्हणुन काम करीत असलेल्या आस्थापनेचे मालक श्री. अली मोहम्मद हिरा शेख यांच्याकडे चौकशी करून त्यांचा जबाब नोंद केला असता त्यांनी सांगीतले की, दिनांक ११/०२/२०१६ रोजी हानिफ हमिद मंडल, १६ वर्षे व सबुर सिराज खान, १६ वर्षे यांना बालमजुरी करवित असल्याच्या कारणाने त्यांच्या विरुध्द दहिसर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ६९/२०१६ कलम ३७४ भा.द.वि. सह २३,२६ बालकल्याण अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करुन नमुद मुलांना सुरक्षिततेसाठी बालसुधार गृह डोंगरी, उमरखाडी, मुंबई येथे ठेवले होते. सदर मुलांना बालसुधार गृह, डोंगरी, येथुन सोडविण्याकरीता बालसुधार गृह, डोंगरी, मुंबई येथे परिविक्षा अधिकारी श्री. रवि यादव यांचे मार्फतीने तेथील कर्मचारी श्री. दिपक सांगळे यांची भेट घेतली होती. तेव्हा श्री. सांगळे यांनी मुलांना सोडविण्यासाठी पालकांना घेवुन येण्यास सांगीतले व सोडविण्यासाठी काय खर्च लागतो ते सांगतो असे सांगितले व मोबाईल क्र. ९०२९७९०१५९ असा दिला.

दि. २४/०२/२०१६ रोजी ते, हानिफ चे वडील हमिद मंडल व सबुर चे वडील सिराज खान असे तीघे मिळुन दिपक सांगळे यांना संबधीत कागदपत्रांसह भेटले, त्यावेळी सुरवातीला मुलांना सोडण्याकरीता प्रत्येक मुलासाठी रु. ३०,०००/– याप्रमाणे एकुण रु. ६०,०००/– भरावे लागतील असे श्री. दिपक सांगळे यांनी सांगीतले. तडजोडीनंतर श्री. दिपक सांगळे यांनी प्रत्येक मुलाचा इन्शुरन्स रू. १०,०००/– प्रमाणे एकुण रु. २०,०००/– भरावे लागतील, ते पैसे नंतर तुम्हाला मिळतील असे सांगितले. तसेच रु. १०,०००/– स्वत: व श्री रवि यादव यांचे खर्चाचे असल्याचे सांगुन असे प्रत्येक मुलाचे १५,०००/– प्रमाणे एकुण रु. ३०,०००/– भरावे लागतील असे सांगीतले. मुलांना बाल सुधारगृहातुन कसेही करुन सोडावयाचे होते, म्हणुन नाईलाजास्तव ते हो म्हणाले व पैशांचा बंदोबस्त करुन येतो असे सांगुन तेथुन निघाले.

दि. २५/०२/२०१६ रोजी ते, हमिद मंडल, सिराज खान व त्यांचा कारागिर ग्यास उद्दीन व श्री राजन सिंग असे सुधारगृह डोंगरी येथे स्टोअर रुममध्ये जावुन श्री. दिपक सांगळे यांना भेटले, तेव्हा श्री सांगळे यांच्या सांगण्याप्रमाणे दोन पाकीटावर मुलांचे नावे लिहुन त्यामध्ये कोर्टात भरावयाची रक्कम व तिसऱ्या पाकीटामध्ये श्री. दिपक सांगळे यांचे मागणी प्रमाणे वेगळी रक्कम भरून तीनही

समक्ष
(प्रविण पावले)
०८/१०/२०
पो.नि./ला.प्र.वि., मुंबई

Scanned with CamScanner

पाकीटातील पैसे अर्धवट बाहेर दिसतील असे ठेवुन श्री. दिपक सांगळे यांचेकडे दिले. श्री. दिपक सांगळे यांनी ती तीनही पाकीटे स्विकारल्याचे सांगीतले.

नमुद प्रकरणी उप मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन एड सोसायटी, माटुंगा, मुंबई श्री. सतिश सुर्यभान बनसोडे, यांच्याकडे चौकशी करून जबाब नोंद केला असता त्यांनी आपल्या जबाबात सांगितले की,झी न्युज चॅनेलवर प्रक्षेपित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने सबंधीत कर्मचारी श्री. दिपक सांगळे, रक्षक यांना कार्यालयाचे पत्र क्र.सी/आस्था/१–पी/१३४, दि. २८/०४/२०१६ नुसार तात्काळ सेवेतुन निलंबित करण्यात आले. तसेच सदर प्रकरणाच्या चौकशीकरीता 'दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी' अंतर्गत मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, माटुंगा, मुंबई यांनी त्रिसदस्य चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने श्री. दिपक सांगळे, हे स्वतः रक्षक पदावर कार्यरत होते व त्यांच्याकडे भांडार लिपीक पदाचा अतिरिक्त कार्यभार होता, असे असताना त्यांनी परिविक्षा अधिकारी यांचा कार्यकक्षात हस्तक्षेप केला आहे अशी बाब निदर्शनास आल्याने, श्री. दिपक सांगळे दोषी आढळुन आले आहेत असा निष्कर्ष नोंदविला आहे. सदरचा अहवाल चौकशी दरम्यान प्राप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणाच्या चौकशी दरम्यान प्राप्त केलेली स्टिंग ऑपरेशनच्या झी न्युज चॅनलच्या बातमीची ऑडीओ व्हिडीओ सीडी मध्ये दिसुन असलेले चित्रीकरण, प्राप्त करण्यात आलेल्या सीडी मधील संभाषणाचे ट्रान्सस्क्रीप्ट, चौकशीच्या अनुषंगाने संबधीतांकडे चौकशी करून नोंद करण्यात आलेले जबाब, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी अंतर्गत मुख्य अधिकारी, दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी, माटुंगा, मुंबई यांच्या त्रिसदस्य चौकशी समितीचा अहवाल यावरून संस्थेत येणाऱ्या प्रवेशितांना पालकाच्या ताब्यात परत देण्याबाबत अहवाल तयार करणे व त्यांना बाल कल्याण समितीपुढे हजर करणे ही जबाबदारी नेमण्यात आलेल्या परिविक्षा अधिकारी यांची आहे, यामध्ये संस्थेतील रक्षक किंवा भांडार लिपीक यांचे काहीएक कर्तव्य नसते. तरी देखील संस्थेमध्ये रक्षक पदावर काम करीत असलेले श्री. दिपक सांगळे यांनी श्री. अली मोहम्मद हिरा शेख यांच्याकडे बालकामगार म्हणुन काम करीत असलेली बालके हानिफ मंडल व सबुर खान यांना बाल सुधार गृहातुन सोडवुन पालकांच्या ताब्यात देण्याकरीता श्री. अली शेख व बालकांचे पालकांकडून गैरलाभ मिळविण्याच्या हेतुने परिविक्षा अधिकारी श्री. रवि यादव यांच्याकरवी बालकांना सोईस्कर असा अहवाल तयार करून घेवुन बालकांची सोडवणुक करवितो असे सांगुन रोख रक्कमेच्या स्वरूपातील मोबदल्याची मागणी केली.

दिपक सांगळे यांनी बाल सुधार गृहाच्या ताब्यात असलेली बालके हानिफ मंडल व सबुर खान यांना त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्याकरीता कायदेशीर मोबदल्याच्या व्यतिरिक्त २० हजार रूपयाच्या मोबदल्याची स्वतःसाठी मागणी करून तडजोडीअंती १८ हजार रूपये रोख रक्कमेचा गैरलाभ स्वतःसाठी मिळविण्याचा प्रयत्न केला असल्याचे निषन्न होत आहे. म्हणुन श्री. दिपक काशिनाथ सांगळे तत्कालीन रक्षक (भांडार लिपीक पदाचा अतिरिक्त पदभार) बालसुधार गृह डोंगरी, मुंबई यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे सरकार तर्फे माझी फिर्याद आहे.

समक्ष

08/10/20

(प्रविण वि. पावले)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंध विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ....... चौकशी करुन

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ....... -

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ....... -

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी यातील आलोसे दिपक काशीनाथ सांगळे, तत्कालीन रक्षक (भांडार लिपीक पदाचा अतिरिक्त पदभार) बालसुधार गृह डोंगरी, मुंबई यांनी निरीक्षण / बालसुधार गृह डोंगरी येथील ताब्यात असलेली बालके त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याकरीता कायदेशीर पारिश्रमी, खर्चीक पारितोषण म्हणून २० हजार रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती १८ हजार रुपये रोख रक्कमेच्या गैरलाभ स्वतःसाठी मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा कलम ७ भ्र.प्र.अधि.१९८८ अन्वये गुन्हा दाखल.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक प्रविण पावले.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ....... -

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ....... - ......., जिल्हा ......., राज्य .......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................... (3) Transferred to P. S. ..................................... District.................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature]

[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

संपूर्ण नाव Name प्रविण विश्वनाथ पावले

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. .......

Posting

Code No. of I. O. .......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख.......

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner